# Sahebraoji Buttepatil Mahavidyalaya

## TYBA

## SEM V

## Tourism Geography

## (पर्यटन भूगोल)

## प्र.क्र.1) पर्यटन भूगोलाचा परिचय

**व्याख्या व स्वरूप**

DEFINITION AND NATURE

संपूर्ण जगामध्ये आजच्या घडीला आधुनिक काळात 'नो रिसेशन बिझनेस म्हणून ज्या व्यवसायाकडे पाहिले जाते तो व्यवसाय म्हणजे पर्यटन होय. 'पर्यटन' हा शब्द इंग्रजीतील Tourism' या शब्दाचे मराठी रूपांतर आहे. हा शब्द

Tour म्हणजे प्रवास या शब्दापासून निर्माण झाला आहे. Tour हा शब्द लॅटिन भाषेतील Tornare तर ग्रीक भाषेतील 'Tornos' म्हणजे सर्कल किंवा वर्तुळ ('tornos meaning 'a lathe or circle; the movement around a central point or axis.) असा अर्थ होतो. Isam या अर्थ Process किंवा कृती असा होतो. या संकल्पनेत मानव, स्थळ, काळ आणि अंतर (Man, Space, Time and Distance) या घटकांचा समावेश होतो. हे चारही घटक प्रवास संकल्पनेशी संबंधित आहेत. कोणत्याही प्रकारचा प्रवास हा जागेसंबंधी शोध घेणे, अभ्यास करणे, संशोधन करणे तसेच व्यवसाय आणि आनंदासाठी केला जात असतो. प्रवासामध्ये मानवाने जे ऐकले आहे ते पाहण्याची त्याची प्रबळ इच्छा अंतर्भूत असते. अलीकडील काळात प्रचलित झालेला 'पर्यटन' हा शब्द साधारणतः तेराव्या शतकात प्रचलित झाला आहे. यामध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठरावीक काळामध्ये परत येणे अपेक्षित आहे.

**व्याख्या : पर्यटन आणि पर्यटक**

(DEFINITIONS OF TOURISTS AND TOURISM)

**व्याख्या पर्यटन** ( Definitions of Tourism) :

प्रवास हा जागेसंबंधी शोध घेणे या संकल्पनेशी संबंधित आहे. यामध्ये विविध स्थळांबाबत मानवाने जे ऐकले आहेत त्याचा अनुभव होणे व ते पाहणे या क्रिया अंतर्भूत असतात.

मानवाच्या या अनुभूतीला अनुभवून पर्यटनाच्या संदर्भात अचूक व शास्त्रीय व्याख्या पुढीलप्रमाणे करता येतील :

"पर्यटन म्हणजे कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने अनिवासी व्यक्तीच्या सहवासातून आर्थिक उत्पादनाशिवाय असलेली भ्रमंती होय. "- प्रा. होन्जी लेअर भ "एखाद्या देशात किंवा शहरात परदेशी व्यक्तीचे आगमन होऊन भ्रमंती करणे व परत स्वगृही जाणे म्हणजे पर्यटन होय. या भ्रमंतीत तो निरनिराळी ठिकाणे पाहतो व आनंद घेतो. - हर्मन व्ही. एस. (1910)

अभ्यासक, संशोधक, खलाशी, व्यापारी, शाखज्ञ हे असत. प्राचीन काळातील प्रवास हा बहुधा पायीच होत असे. काही प्रमाणात पारंपरिक वाहतुकीच्या साधनांच्या किंवा जनावरांच्या साहाय्याने होत असे. मध्यंतरीच्या काळात रोम, अथेन्स यांसारख्या शहरांना भेटी देण्यासाठी प्रवास म्हणजे पर्यटन होऊ लागले.

इ. स. पूर्व 334 मध्ये अलेक्झांडर या राजाच्या काळात सात लाखांपेक्षा जास्त लोकांनी रोम या शहराला भेट दिल्याच्या नोंदी आहेत. अठराव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे नवनवीन प्रवासाची साधने विकसित झाली. पर्यटकाचा वेळ व पैसा यामध्ये बचत होऊ लागली आणि पर्यटनाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

सन 1776 मध्ये ते लंडन ते मँचेस्टर या दरम्यान प्रवासी जलवाहतुकीस सुरुवात झाली तर सन 1830 मध्ये इंग्लंडमध्ये लंडन ते मँचेस्टर या दरम्यान पहिली रेल्वे सुरू झाली. सन 1908 मध्ये पहिले विमान प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध झाले. अशा प्रकारे वाहतुकीच्या साधनांचा प्रसार जगभर होत गेला. सन 1869 मध्ये सुएझ कालव्यामुळे पश्चिमेकडील युरोप खंडात आणि अमेरिका खंडातील देशाकडे केला जाणारा प्रवास व त्याचे अंतर बरेचसे कमी झाले. एकोणिसाव्या व विसाव्या शतकात वाहतुकीची सर्व प्रकारची साधने विकसित झाली. त्याचा वेगही प्रचंड वाढला. त्यामुळे सहजरीत्या जगभर प्रवास होऊ लागला. आजमितीस प्रवासाची अनेक माध्यमे उपलब्ध आहेत, त्यामुळे वेळ व पैसा यांची बचत होऊ लागली आहे आणि लोक पर्यटन म्हणून संपूर्ण जगभर प्रवास करू लागले आहेत. प्राचीन काळात केला जाणारा प्रवास हा विशिष्ट हेतू व उद्देश मनात ठेवून केला जात असे. प्रवासासाठी विशिष्ट असे कारण असावे लागत असे. परंतु अठराव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे लोकांचे कामाचे स्वरूप बदलत गेले. नागरिकीकरणामुळे प्राथमिक क्षेत्रातील व्यवसायाकडून द्वितीय व तृतीय क्षेत्रातील व्यवसायाकडे लोकांचे झपाट्याने संक्रमण झाले. याच कालखंडात शनिवारची अर्धी सुट्टी आणि रविवारची पूर्ण सुट्टी. प्रदेशानुसार ऋतूकालीन आणि दीर्घ सुट्ट्या (उन्हाळा, पावसाळा, हिवाळा) या संकल्पना अस्तित्वात आल्या. त्यामुळे लोकांना दैनंदिन कामाशिवाय रिकामा किंवा

फावला वेळ अधिक प्रमाणात मिळू लागला. या फावल्या वेळात करावयाच्या अनेक बाबींपैकी हळूहळू आनंद व मनोरंजन मिळविण्यासाठी जो प्रवास होऊ लागला त्यालाच 'पर्यटन' असे म्हणण्यात येऊ लागले. आजमितीस फक्त आनंद, मनोरंजन आणि करमणूक यापुरते पर्यटन मर्यादित न राहता आरोग्यवर्धक उद्देशाधिष्ठित अशा व्यापक अर्थाने पर्यटनाकडे पाहण्यास सुरुवात झाली आहे.

## व्याख्या व स्वरूप

DEFINITION AND NATURE

## प्रवास

संपूर्ण जगामध्ये आजच्या घडीला आधुनिक काळात 'नो रिसेशन बिझनेस म्हणून ज्या व्यवसायाकडे पाहिले जाते तो व्यवसाय म्हणजे पर्यटन होय.

'पर्यटन' हा शब्द इंग्रजीतील Tourism' या शब्दाचे मराठी रूपांतर आहे. हा शब्द Tour म्हणजे प्रवास या शब्दापासून निर्माण झाला आहे. Tour हा शब्द लॅटिन भाषेतील Tornare तर ग्रीक भाषेतील 'Tornos' म्हणजे सर्कल किंवा वर्तुळ ('tornos' meaning 'a lathe or circle; the movement around a central point or axis.) असा अर्थ होतो. Isam या अर्थ Process किंवा कृती असा होतो. या संकल्पनेत मानव, स्थळ, काळ आणि अंतर (Man, Space, Time and Distance) या घटकांचा समावेश होतो.. हे चारही घटक प्रवास संकल्पनेशी संबंधित आहेत. कोणत्याही प्रकारचा प्रवास हो जागेसंबंधी शोध घेणे, अभ्यास करणे, संशोधन करणे तसेच व्यवसाय आणि आनंदासाठी केला जात असतो. प्रवासामध्ये मानवाने जे ऐकले आहे ते पाहण्याची त्याची प्रबळ इच्छा अंतर्भूत असते. अलीकडील काळात प्रचलित झालेला 'पर्यटन' हा शब्द साधारणतः तेराव्या शतकात प्रचलित झाला आहे. यामध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठरावीक काळामध्ये परत येणे अपेक्षित आहे.

व्याख्या : पर्यटन आणि पर्यटक

(DEFINITIONS OF TOURISTS AND TOURISM)

## व्याख्या पर्यटन ( Definitions of Tourism) :

प्रवास हा जागेसंबंधी शोध घेणे या संकल्पनेशी संबंधित आहे. यामध्ये विविध स्थळांबाबत मानवाने जे ऐकले आहेत त्याचा अनुभव होणे व ते पाहणे या क्रिया अंतर्भूत असतात.

मानवाच्या या अनुभूतीला अनुभवून पर्यटनाच्या संदर्भात अचूक व शास्त्रीय व्याख्या पुढीलप्रमाणे करता येतील :

“पर्यटन म्हणजे कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने अनिवासी व्यक्तीच्या सहवासातून आर्थिक उत्पादनाशिवाय असलेली भ्रमंती होय.” प्रा. होन्जी लेअर 36 “एखाद्या देशात किंवा शहरात परदेशी व्यक्तीचे आगमन होऊन भ्रमंती करणे व परत स्वगृही जाणे म्हणजे पर्यटन होय. या भ्रमंतीत तो निरनिराळी ठिकाणे पाहतो व आनंद घेतो. “ – हर्मन व्ही. एस. (1910)

“गिर्यारोहण व नौकानयन करणे, खेळ खेळणे, सायकलवरून फिरणे यासाठी होणारी भ्रमंती म्हणजे पर्यटन होय.’ – जौस अँरिलागा (1993)

“कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली व्यक्ती व तिच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्ण घटना म्हणजे पर्यटन होय.” – हुझीकेर व क्रॅप “एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी जाऊन कायमस्वरूपी वस्ती न करता एक वर्षाच्या आत इतर गोष्टी करून परत

मूळ वास्तव्याच्या ठिकाणी परत येते या कृतीस पर्यटन असे म्हणतात.” जागतिक पर्यटन संघटन.

“पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने घराबाहेर ऐच्छिक, ठरावीक काळासाठी केलेली क्रिया होय. यात घराबाहेर एखादा मुक्काम केला किंवा नाही याचा सहभाग महत्त्वाचा नसतो.” – कार्डिक पर्यटन संस्था (ब्रिटन)

“पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन किंवा ऐषारामासाठी केलेले असते, “ब्रिटन पर्यटन संस्था

“एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी सलग एक वर्षापेक्षा अधिक काळ न राहता विश्रांती, उद्योग किंवा इतर कामासाठी भ्रमंती किंवा प्रवास करते या सर्वांचा अंतर्भाव पर्यटनात होतो.” “पर्यटक, सरकार, विविध व्यवसाय व समाज यांच्या विविध अद्भुत पर्यटन स्थळांच्या माध्यमातून घडणारे संप्रेषण तसेच पर्यटक व इतर भेटी देणाऱ्या व्यक्तींना आकृष्ट व आतिथ्य करण्याच्या सर्व प्रक्रियेला पर्यटन असे म्हणतात.”

“पर्यटन भूगोल पर्यटन आणि भौगोलिक घटक यांचा सहसंबंध स्पष्ट करणारे शास्त्र म्हणजे पर्यटन भूगोल होय. “ “पर्यटन या मानवी आविष्काराचा भौगोलिक घटकांवर होणारा परिणाम याचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे पर्यटन भूगोल होय.”

“जर्मन तज्ज्ञ कॅराफ हे पर्यटन या क्रियेचा अर्थव्यवस्थेशी संबंध लावताना म्हणतात की, “पर्यटन हे आर्थिक संबंधाचे जाळे आहे.”

“परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात व शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून गमन म्हणजेच पर्यटन होय.” -हर्मन श्युलर्ड

“Tourism is a comprehensive activity of travelling and staying in a place outside the usual environment for not more than one year for leisure, business other purpose to resume.”

पर्यटनासंबंधी आपले विचार व्यक्त करताना डॉ. जिरोमिन हे पर्यटनाचा संबंध समान व्यवस्थेशी व समाजातील विविध प्रक्रियेशी लावतात; ते असे म्हणतात की, “पर्यटन म्हणजे सामाजिक प्रक्रिया आहे. थोडक्यात, पर्यटन या संकल्पनेत तात्पुरत्या कालावधीकरिता विशिष्ट हेतूने केला

गेलेला प्रवास अपेक्षित आहे. पर्यटन या व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारची साधनसामग्री अथवा यंत्रसामग्री किंवा मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक होत नाही. व्यक्ती जो करत असते त्यापासून पर्यटन घडून येत असते. मग हा प्रवास अगदी स्थानिक ठिकाणापासून आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध ठिकाणे पाहण्याकरिता केला जाऊ शकतो. पर्यटनाचे आधुनिक काळात ठिकाणानुसार, प्रदेशानुसार, अंतरानुसार, कालावधीनुसार प्रवास आणि उद्देशानुसार विविध प्रकार होतात. पर्यटनामध्ये जो प्रवास केला जातो किंवा जी संपूर्ण क्रिया घडून येते यामध्ये कोणत्याही प्रकारचे उत्पादन घडून येत नाही. भूगोल आणि पर्यटन यांचा नजीकचा संबंध आहे. भूगोल अभ्यासकांना ‘पर्यटन’ या क्रियेचा अभ्यास करावा लागतो. कारण पर्यटनामुळे भौगोलिक तसेच सांस्कृतिक भूदृश्यामध्ये बदल घडून येते. पर्यटन भौगोलिक घटक यामध्ये जो समन्वय प्रस्थापित करतात, या घटकांचाच पर्यटन भूगोलामध्ये अभ्यास केला जातो. –

## व्याख्या पर्यटक (Definitions of Tourist) :

पर्यटन या क्रियेमधील ‘पर्यटक’ हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. पर्यटन ही जर क्रिय आहे तर ती क्रिया पूर्ण करणारा पर्यटक हा कर्ता असतो. त्यामुळे पर्यटकाशिवाय पर्यटन क्रिया अपूर्ण राहते. पर्यटकांशिवाय कोणत्याही प्रकारचे

पर्यटन पूर्ण होणे केवळ अशक्द असते. पर्यटनाच्या कोणत्याही व्याख्येमध्ये पर्यटन ही क्रिया पूर्ण करणारी व्यक्ती म्हणून पर्यटक मानल्यास पर्यटकाची व्याख्या पूर्ण होते.

पर्यटकाची व्याख्या करताना अनेक अभ्यासकांनी विविध स्वरूपात केल्या आहेत,त्या पुढीलप्रमाणे :

“जो आनंद उपभोगण्यासाठी प्रवास करतो तो पर्यटक होय.”-शब्दकोश

“परदेशी जाणारी प्रत्येक व्यक्ती जी कायम वास्तव्य किंवा रोजगाराच्या कारणाव्यतिरिक्त जातात व इतरत्र मिळविलेला पैसा तेथे खर्च करतात अशा व्यक्तीला पर्यटक असे म्हणतात. ॐ “जी व्यक्ती निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी चांगल्या स्थळांना भेट देण्यासाठी किंवा सौंदर्य स्थळांना भेट देणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.’-मराठी विश्वकोश

कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात भ्रमंती किंवा प्रवास करण्याच्या व्यक्तीस पर्यटक असे म्हणतात.’

## पर्यटनाचे स्वरूप (NATURE OF TOURISM)

पर्यटनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे:

1)पर्यटनाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप पर्यटन हा वैशिष्ट्यपूर्ण असा उद्योग किंवा व्यवसाय आहे. इतर क्रियांपेक्षा पर्यटन ही क्रिया बहुआयामी अशा स्वरूपाची आहे. या क्रियेमध्ये केला गेलेला प्रवास आणि वास्तव्याचे ठिकाण

या दोन्ही बाबी नेहमीच्या निवासस्थानापासून व कार्यक्षेत्रापासून दूर असतात. पर्यटन या व्यवसायामध्ये प्रत्यक्ष कोणत्याही प्रकारची गुंतवणूक नसतानाही मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते. इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करण्यासाठी प्रत्यक्ष व्यावसायिक उभारणी करावी लागते. त्याकरिता जागा, बांधकाम, अवजारे, भांडवल, कामगार या बाबी येतात. परंतु पर्यटन या व्यवसायाकरिता यांपैकी काहीच करावे लागत नाही, पर्यटन हा जरी व्यवसाय असला तरी मानवाकडून केली जाणारी ती एक क्रिया जास्त प्रमाणात आहे. या व्यवसायात अनेक व्यवसाय एकत्र जोडलेले असतात. त्यामुळे अनेक क्रियांनी मिळून पर्यटन घडून येताना दिसते, त्यामुळे पर्यटन या व्यवसायाचे किंबहुना पर्यटनाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण आहे.

2)पर्यटनाचे अनेकविध स्वरूप पर्यटन ही विविधता असलेली अपूर्ण घटना आहे. पर्यटनामध्ये मानवाचे किंवा व्यक्तीचे आपल्या निवासस्थानापासून निघाल्यानंतर पुन्हा परत घरी येईपर्यंत अनेक घटकांशी संबंध येत असतात. पर्यटकाकडून विविध प्रकारची निवासस्थाने, विविध प्रकारची प्रवासाची माध्यमे (उदा., रस्ते, रेल्वे, जल व हवाई वाहतूक) यांचा उपयोग केला जात असतो. त्याचप्रमाणे पर्यटक हा पर्यटन करत असताना त्याच्याकडून विविध प्रकारच्या पर्यटन स्थळांना भेटी दिल्या जातात. पर्यटन करत असताना पर्यटकानुसार त्याचे हेतूही भिन्न-भिन्नं स्वरूपाचे असतात. पर्यटकांची प्रवासाची अंतरे, पर्यटकांची संख्या या सर्वच बाबतीत भिन्नता आढळून येते. इतर कोणत्याही व्यवसायाशी तुलना केली असता पर्यटनामध्ये प्रचंड विविधता आढळून येते. त्यामुळे पर्यटनाचे स्वरूप अनेकविध असल्याचे दिसते.

3)पर्यटनाचे करमणूकप्रधान स्वरूप : फावला वेळ किंवा रिकामा वेळ म्हणजे व्यक्तीच्या दैनंदिन कामकाजातून शिल्लक राहिलेला वेळ असतो. या वेळेचा उपयोग प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या मार्गे मनाला विरंगुळा प्राप्त होईल अशा पद्धतीने व्यतित करण्याचा प्रयत्न करते. यामध्ये अनेक छंद जोपासणे, खेळ खेळणे आणि पर्यटनसारख्या मनोरंजनात्मक बाबींचा समावेश होतो. पर्यटन या क्रियेमध्ये विविध नैसर्गिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी देणे, नयनरम्य देखावे पाहणे, आल्हाददायी हवामानाचा आनंद घेणे, निर्यारोहण करणे, यात्रा व सहली यांचे नियोजन करणे यांसारख्या बाबींचा समावेश होतो. या सर्व बाबींमधून करमणूक होणे हेच अपेक्षित असते. बऱ्याचदा पर्यटनाचा उद्देश हा करमणूक, मनोरंजन, विरंगुळा यांच्याशी संबंधित असतो आणि म्हणून पर्यटनाचे स्वरूप करमणूकप्रधान आहे.

4)पर्यटनाचे गतिशील स्वरूप पर्यटनाचे गतिशील स्वरूप हे स्थिर व गतिशील अशा दोन्ही प्रकारचे आहे. जेव्हा पर्यटक प्रवास करत असतो तेव्हा तो गतिशील असतो आणि जेव्हा तो एखाद्या ठिकाणी निवास करून तेथील पर्यटन स्थळांचा आस्वाद घेत असतो त्या वेळी तो स्थिर असतो. याशिवाय पर्यटन या क्रियेमध्ये काळाच्या ओघात जे बदल घडून आले त्यामुळेही पर्यटनाचे स्वरूप गतिशील आहे असे म्हणावे लागेल, म्हणजे प्रारंभिक अवस्थेत स्थानिक प्रदेशांना भेटी देणे, पायी किंवा जनावरांच्या साहाय्याने प्रवास करणे इतका मर्यादित असलेला पर्यटनाचा अर्थ आजमितीय प्रवासाची वाढलेली व गतिशील असलेली विविध माध्यमे यामुळे सहजरीत्या कित्येक दूर अंतरावरच्या प्रदेशात प्रवास – होऊ लागला. पर्यटनामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक

उलाढाल होऊ लागली. पर्यटनाचे सादरीकरण करण्यासाठी आधुनिक माध्यमाचा किंवा साधनांचा उपयोग होऊ लागला. पर्यटन घडवून आणणाऱ्या व त्याकरिता सेवा देणाऱ्या विविध संस्था विकसित झाल्या आणि त्यामुळे पर्यटन सुखकर होऊ लागले. काळानुरूप पर्यटनामध्ये आमूलाग्र बदल होत गेल्याचे दिसते. काळानुरूप होणाऱ्या सर्व बदलांचा स्वीकार 'पर्यटन' या क्रियेद्वारे सहज स्वीकारला गेल्याचे दिसते. म्हणून असे म्हणावे लागते की, पर्यटनाचे स्वरूप गतिमान किंवा गतिशील आहे.

5)पर्यटनाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप : पर्यटन ही क्रिया घडून येत असताना ज्या स्थळांना व्यक्ती भेटी देते त्या स्थळांविषयी भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, वाहतूक व संदेशवहन, भाषा, हवामान यांसारख्या अनेक गोष्टींची माहिती असेल तर पर्यटन उत्तम रीतीने घडून येते, या सर्व बाबींची माहिती करून घेत असताना त्या-त्या संबंधित विषयाचा किंवा विद्याशाखांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय माहिती मिळणे अशक्य असते, या प्रकारची माहिती मिळाल्याशिवय पर्यटन घडून येऊ शकत नाही.

उदाहरणार्थ, एखाद्या पर्यटन स्थळाला भेट देत असताना त्या ठिकाणचे हवामान कोणत्या स्वरूपाचे आहे, भौगोलिक रचना कशा स्वरूपाची आहे, कोणकोणते वनस्पती व प्राणी उपलब्ध आहेत, कोणकोणती भूदृश्ये पाहण्याजोगी आहेत; याशिवाय महत्त्वाचे म्हणजे पर्यटन स्थळाचा नकाशा ही माहिती भूगोलाच्या अभ्यासातूनच मिळू शकते.

संबंधित पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी वाहतुकीची कोणकोणती साधने उपलब्ध आहेत. अपेक्षित खर्च किती आहे या सर्व आर्थिक घटकांचा अभ्यास करावा लागतो. याप्रमाणेच विद्याशाखांचा संदर्भ किंवा अभ्यास करावा लागत असल्यामुळे पर्यटनाचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आहे.

6)पर्यटनाचे अनुत्पादक स्वरूप : पर्यटन हा तृतीय क्षेत्रातील व्यवसाय आहे. या व्यवसायामध्ये विविध सेवा समाविष्ट होतात आणि या सेवांच्या समन्वयाने पर्यटन परिपूर्ण होते. पर्यटन क्षेत्रामध्ये प्रत्यक्षात कारखानदारीमध्ये ज्या प्रकारची गुंतवणूक केली.

जाते त्या प्रकारची गुंतवणूक केली जात नाही किंवा विविध वस्तूंचे उत्पादनही घेतले जात नाही आणि त्यातून आर्थिक प्राप्तीही होत नाही. म्हणजेच पर्यटनामध्ये अशा प्रकारची कोणतीही भांडवली गुंतवणूक नसते, कोणत्याही प्रकारच्या नवीन वस्तूरूपाने उत्पादन घेतले जात नाही; त्यामुळे पर्यटन हा प्रत्यक्षरीत्या अनुत्पावक व्यवसायात मोडणारा व्यवसाय आहे. तरीही पर्यटनाला व्यवसाय म्हटले जाते कारण पर्यटनामधून वेगवेगळ्या प्रकारच्या रोजगाराची निर्मिती होते आणि पर्यटकांकडून खर्च केलेला पैसा हा विविध सेवांच्या मोबदल्यात जमा होऊन समाजातील अनेक घटकांपर्यंत पोहोचण्याची क्रिया होते. त्यामुळे वस्तू स्वरूपात पर्यटन हा अनुत्पादक असा व्यवसाय असला तरी अप्रत्यक्षरीत्या या व्यवसायात मोठी आर्थिक उलाढाल होत असते. म्हणून पर्यटन हा व्यवसाय वस्तू उत्पादनाशिवाय फार मोठी आर्थिक प्राप्ती करून देणारा व्यवसाय आहे.

7)पर्यटनाचे हंगामी स्वरूप : विशिष्ट हंगामामध्ये पर्यटक विशिष्ट पर्यटन स्थळांना भेटी देत असतात. भारतामध्ये तीन ऋतू किंवा हंगाम आहेत. या ऋतूमध्ये विशिष्ट प्रदेशातील पर्यटन स्थळे गजबजलेली असतात. किंबहुना विविध प्रकारचे सण व उत्सव हे देखील हंगामी स्वरूपाचे असतात. पावसाळ्याच्या दिवसात

पर्यटक धबधबे पाहण्यासाठी डोंगराळ प्रदेशातून पर्यटन करतात. हिवाळ्याच्या दिवसात उष्ण प्रदेशात म्हणजे समुद्रकिनारी, काही प्रमाणात वाळवंटे पाहण्याकडे लोकांचा कल असतो. उन्हाळ्याच्या दिवसात थंड हवेच्या ठिकाणांना भेटी दिल्या जातात. भारतामध्ये समुद्रकिनारपट्टीच्या प्रदेशात डिसेंबर व जानेवारी महिन्यामध्ये असंख्य पर्यटक भेटी देतात. उदा., गोवा, कोकण किनारपट्टी, केरळ. या प्रदेशात थंडीच्या काळात पर्यटकांची भरपूर रेलचेल असते.

उन्हाळ्याच्या दिवसात हिमाच्छादित प्रदेशातील बर्फ वितळल्यानंतर पर्यटकांची संख्या वाढते. भारतातील हिमालयाच्या प्रदेशात असलेली कुलू-मनाली, गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ ही सर्व पर्यटन स्थळे एप्रिल व मे महिन्यापासून दिवाळीपर्यंत पर्यटकांसाठी खुली असतात. सुट्ट्यांचा परिणामदेखील

थोडक्यात, ऋतू म्हणजेच हंगामी विविध प्रकारच्या पर्यटकांच्या संख्येवर होताना दिसतो.

## पर्यटनाचे महत्त्व (IMPORTANCE OF TOURISM)

पर्यटन हा तृतीय श्रेणीतील सेवाभावी व्यवसाय आहे की, जो सातत्याने वाढताना दिसून येत आहे. पर्यटनाच्या विकासाबरोबरच स्थानिक प्रदेशाचादेखील किंवा पर्यटन स्थळांचा झपाट्याने विकास होत आहे. पर्यटनामुळे झालेला विकास आपल्याला अल्प कालावधीमध्ये पाहावयास मिळतो. सर्वांगीण दृष्टिकोनातून विचार केला तर पर्यटनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढताना दिसून येते.

पर्यटनाचा महत्त्वाचा विचार करता, पर्यटनाचे महत्त्व पुढील मुद्द्यांच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

1)रोजगारामध्ये वाढ : पर्यटनामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या रोजगाराची निर्मिती होत असते. पर्यटन व्यवसायाला कुशल व अकुशल अशा दोन्ही कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. पर्यटनातून विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध होत असतात. अत्यंत कुशल कामगारांपासून तज्ज्ञ प्रशिक्षित विशिष्ट अनुभवी कामगारांपर्यंत सर्वांचा समावेश पर्यटन व्यवसायात होत असतो. उच्चशिक्षितांपासून अनुभवी व विशिष्ट प्रशिक्षण घेतलेले कामगार पर्यटन क्षेत्रात आवश्यक असतात. उदारणार्थ, हिशेबतपासनीस, आचारी, वेटर्स, हाउसकीपर, माळी काम करणारे कर्मचारी हे कुशल कामगारांमध्ये येतात तर अकुशल कामगारांमध्ये हमाल, झाडूवाले, बागबगिच्यांची स्वच्छता करणारे लोक, स्वयंपाकगृहामधील इतर काम करणारे लोक यांचा समावेश होतो.

स्थानिक बाजारपेठेमध्ये वस्तूंची विक्री करणारे विक्रेते तर स्थानिक प्रदेशांमध्ये उत्पादित होणाऱ्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग आणि त्याला लागणारा कच्चा माल पुरवठा करणारे कामगार, वाहतुकीचे काम करणारे चालक-मालक, विविध उपकरणे व अवजारे आणि ते तयार करणारे कारखान्यातील कामगार या सर्वांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे पर्यटन व्यवसायामध्ये समावेश होतो.

प्रसिद्ध पर्यटन तज्ज्ञ रिचर्ड्स यांच्या मते, एखाद्या प्रदेशात निर्माण झालेल्या शंभर टक्के रोजगारांपैकी साठ टक्के रोजगार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पर्यटनाशी संबंधित असतात.

1. नवनवीन बाजारपेठा आणि त्यांचा विकास पर्यटन केंद्राच्या ठिकाणी पर्यटनाला आलेल्या हौशी पर्यटकांना स्थानिक बाजारपेठेचा मोह पडतो. जर या बाजारपेठा विकसित आणि सोईसुविधांनी समृद्ध असतील तर व्यापार वृद्धिंगत होण्यास मदत होत असते. स्थानिक प्रवेशांमध्ये तयार होणाऱ्या कलाकुसरीच्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होते, कुटीरोद्योगाला चालना मिळते. कलाकुसरीच्या वस्तू, आकर्षक भरतकाम व विणकाम केलेले कापड, स्वेटर, शाली, लोकरीचे कपडे, लाकडी वस्तू, चांदीच्या वस्तू, लाकडी खेळणी, चामडी वस्तू या सर्व वस्तूंची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांचा मोठा फायदा होतो, उदाहरण द्यायचे झाले तर महाबळेश्वर येथील विकसित झालेली बाजारपेठ आणि त्यातून स्थानिक शेतकऱ्यांना झालेला फायदा, तसेच कोल्हापूर येथील चामडी वस्तू आणि चप्पल्स, सोलापूर येथील चादरी आणि सावंतवाडी येथील लाकडी खेळणी प्रसिद्ध आहेत. अनेक पर्यटक या ठिकाणी गेल्यानंतर या वस्तू खरेदी करत असतात.

2. परकीय चलन : पर्यटन व्यवसायाला 'अदृश्य निर्यात' असे म्हटले जाते. पर्यटनामुळे परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळते. विदेशी पर्यटकांना वेगवेगळ्या सेवासुविधा पुरविल्यामुळे या सेवांच्या मोबदल्यात परकीय चलन उपलब्ध होते.

   विकसित देशातून अविकसित देशांमध्ये पर्यटन जर घडून येत असेल तर परकीय चलनाचा अविकसित देशाला मोठ्या प्रमाणामध्ये फायदा होत असतो. थोडक्यात, विकसित देशांमध्ये मौजेसाठी खर्च करण्याची प्रवृत्ती अधिक असल्याने पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढीला लागते. विकसित देशातील पर्यटक हे विकसनशील व अविकसित देशांमध्ये पर्यटनाला गेल्यामुळे अशा देशाच्या सर्वांगीण विकासामध्येदेखील भर पडते. विकसनशील व अविकसित देशांमध्ये उपलब्ध होणाऱ्या परकीय चलनाच्या साठ्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये औद्योगिकदृष्ट्या विकसित असणाऱ्या देशांकडून औद्योगिक माल आयात करता येतो.

3. देशाच्या आर्थिक विकासात साहाय्य पर्यटन हा असा उद्योग आहे की, ज्यामुळे अविकसित देशात जलद आर्थिक विकास होण्यास मदत होते आणि त्यामुळे उद्योगाच्या विकासाकडे अधिकाधिक लक्ष दिले जाते. अशा औद्योगिकीकरणासाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते. असे भांडवल पर्यटकांकडून उपलब्ध होणाऱ्या पैशातून मिळविता येते. एखाद्या प्रदेशाची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थिती आणि पर्यटकांच्या आवडीनिवडी पाहून वाहतूक, इमारती, उद्याने यांवर सरकार खर्च करत असते, मूलभूत सेवासुविधा उपलब्ध होत असल्यामुळे पर्यटन विकासाच्या वाढीबरोबर एकूणच देशाचा आर्थिक विकास वाढला जातो. पर्यटन व्यवसायामध्ये केली जाणारी गुंतवणूक

नियोजनपूर्वक असल्याने त्याचे अधिक फायदे होतात. शिवाय स्थानिक उत्पादनावर आधारित हस्तोद्‌योग, कुटीरोद्‌योग वाढीला लागल्यामुळे एकूणच देशाच्या आर्थिक विकासात साहाय्य होते.

4. राष्ट्राच्या उत्पन्नात वाढ कोणत्याही देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जर विचारात घेतले तर त्या उत्पन्नामध्ये सातत्याने वाढ होणे हे राष्ट्राच्या हिताचे असते. पर्यटन व्यवसायाच्या वाढीतून एकूण उत्पन्नामध्ये जर वाढ होत असेल तर ते पर्यटनाबरोबरच राष्ट्राच्या दृष्टीनेदेखील सोईचे असते. पर्यटन हा तृतीय श्रेणीतील सेवाभावी व्यवसाय असल्याने वा व्यवसाय उच्च दर्जाचा समजला जातो. या व्यवसायामधून सेवा पुरविली जाते की, जी राहण्याची, जेवणाची व करमणुकीची असते. सेवा म्हटले की त्यावरती कर लावले जातात. जसजशी सेवांमध्ये वाढ होईल तसतसे करामधून प्राप्त होणारे उत्पन्नदेखील वाढत जाते. त्यामुळे पर्यटन या व्यवसायामुळे राष्ट्राच्या उत्पन्नात वाढ होते..

5. सरकारला मिळणारा महसूल पर्यटन केंद्राच्या ठिकाणी चालणारी हॉटेल्स, खानावळी, दुकाने, टॅक्सी, क्लब, विविध पदार्थ यांवर सरकार कर लावते. या करामुळे सरकारच्या महसुलात वाढ होते. त्याचबरोबर स्थानिक भागातील ग्रामपंचायतदेखील आपला कर पर्यटकांवर लावत असतात व त्यातून स्थानिक ग्रामपंचायतीलादेखील उत्पन्न प्राप्त होते. पर्यटनस्थळी पर्यटक विविध चैनीच्या वस्तू खरेदी करत असतो. त्यातील अनेक वस्तू देशातील अनेक ठिकाणांवरून तसेच विदेशातूनदेखील आयात केलेल्या असतात. अशा आयात केलेल्या वस्तूंवर विविध प्रकारचे कर तसेच विक्रीकर लावले जातात. यातून सरकारला मोठ्या प्रमाणामध्ये महसूल मिळतो.
6. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना पर्यटनाचे केंद्र हे ग्रामीण भागामध्येदेखील असते. यामुळे बाहेरून येणारा पर्यटक स्थानिक बाजारपेठेमध्ये विविध वस्तूंची खरेदी करत असतो; ज्या वस्तू त्या स्थानिक प्रदेशांमध्ये निर्माण होतात. यामुळे वस्तूनिर्मिती करणारे कारागीर हस्तकला व विणकाम करणारे कारागीर यांना पैसा मिळतो. हाच पैसा स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत म्हणून उपयोगी पडतो.

7. प्रादेशिक असमतोल कमी होतो: पर्यटनाचा विकास हा प्रदेशा- प्रदेशांमधील प्रादेशिक असमतोल कमी करण्यास मदत करतो. भारतातील काश्मीर व गोवा या साधनसंपत्तीचे मर्यादित असणाऱ्या राज्याचा विकास हा पर्यटनामध्ये सहज शक्य झालेला आहे. पर्यटनामुळे विकसित देशातून विकसनशील व अविकसित देशाकडे संपत्तीचा ओघ सुरू राहतो. भारतामधील अनेक पर्यटन स्थळांचा विकास हा विदेशातील आलेल्या पर्यटकांमुळेच झालेला आपणाला दिसून येतो. उदाहरणच द्‌यायचे असेल तर अजंठा-वेरूळ येथील लेणी,

8. कृषिव्यवसायाचा विकास अलीकडच्या कालखंडामध्ये कृषी पर्यटनाला चालना : देण्याचे सरकारचे धोरण असल्यामुळे कृषी पर्यटन हे कवीला पूरक व्यवसाय म्हणून उदयास आले आहे. अनियमित

पर्जन्य, शेतमालाच्या किमतीतील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांचे जीवन शेतीकर्जाकडे चालले आहे. यातून शेतकऱ्यांना जर मार्ग काढायचा असेल तर कृषीपूरक जोडव्यवसाय असणे गरजेचे आहे. कृषी पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होतो आणि शेतकऱ्यांनादेखील त्याचा फायदा होतो.

9. हस्तकला व्यवसायाच्या विकासाला चालना : पर्यटनामुळे हस्तकला व्यवसाय विकसित होत आहे. भारतातील हस्तकला उद्योग जगभर प्रसिद्ध आहे. या हस्तकला व कलाकुसरीच्या वस्तूंच्या निर्मितीमुळे भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव अहि. स्थानिक प्रदेशातील म्हणजे जम्मू-काश्मीरमधील शाली, गालिचे, गोवा व तमिळनाडू या राज्यांतील सागरकिनाऱ्यावर मिळणाऱ्या शंख-शिंपल्यांच्या माळा, सावंतवाडी येथे तयार होणाऱ्या लाकडी खेळण्यांचा पुरवठा भारतातील अनेक पर्यटनस्थळी केला जातो. यामुळे हस्तकला करणाऱ्या लोकांना एक प्रकारे रोजगार उपलब्ध होतो आणि हा व्यवसाय वाढीस लागण्यास चालना मिळते.

याशिवाय पर्यटनामुळे अनेक लहान-मोठ्या बाबींच्या संदर्भात माहिती मिळण्यास मदत होते हे देखील पर्यटनाचे महत्त्वच आहे.

1)पर्यटनामुळे निसर्गामध्ये असणाऱ्या जैवविविधतेची माहिती मिळण्यास मदत होते.

2)पर्यटनामुळे दुसऱ्या प्रदेशातील हवामानाची माहिती मिळते; हवामान बदलासंदर्भात अभ्यास करणे शक्य होते.

3)पर्यटनामुळे विविध ठिकाणची भौगोलिक रचना कशा प्रकारची आहे हे समजते.

पर्यटन आणि वाहतूक पर्यटनामध्ये वाहतुकीची भूमिका अनन्यसाधारण आहे. पर्यटक आपल्या निवासस्थानापासून पर्यटन स्थळापर्यंत जाण्याकरिता वाहतुकीच्या कोणत्या ना कोणत्या माध्यमाचा/साधनाचा उपयोग करत असतो. प्राचीन काळाच्या तुलनेत आधुनिक काळात वाहतुकीची विविध साधने विकसित झालेली आहेत. पूर्वीच्या काळ पर्यटक, यात्रेकरू बहुतांशी पायी किंवा जनावरांच्या साहाय्यानेच प्रवास करत होते. आजमितीस रस्तेमार्ग, रेल्वेमार्ग, जलमार्ग, हवाईमार्ग असे विविध पर्याय वाहतुकीसाठी उपलब्ध आहेत. थोडक्यात, वाहतुकीचे सर्व पर्याय प्रवासासाठी उपलब्ध आहेत.

(1)

(2) ज्या पर्यटन स्थळावर जाण्याकरिता वाहतुकीचे सर्व पर्याय उपलब्ध आहेत त्या पर्यटन स्थळांचा द्रुतगतीने विकास झालेला दिसतो. उदा., गोवा या राज्यातील पर्यटन स्थळावर जाण्याकरिता वाहतुकीचे सर्व म्हणजे जलमार्ग, हवाईमार्ग, रेल्वेमार्ग आणि रस्तेमार्ग के पर्या उपलब्ध आहेत. त्यामुळे गोवा या राज्यामध्ये पर्यटनाच्या संदर्भात मोठा विकास झाला आहे. गोव्याच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये पर्यटन क्षेत्राचा वाटा मोठा आहे. त्या तुलनेत महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीला गोव्याइतकेच निसर्गसौंदर्य प्राप्त झाले

असूनही वाहतुकीच्या साधनाच्या मयविमुळे गोव्याच्या तुलनेत कोकण किनारपडीला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्य अत्यंत कमी आहे.

(3)

(4) मानवाच्या शरीरामध्ये रक्तवाहिन्यांचे जाळे जेवढे चांगले असेल तेवढा शारीरिक विकास निकोप होतो. एखाद्या भागाला रक्तपुरवठा कमी झाला तर त्याची वाढ खुंटते. अगदी तसेच उत्तम प्रतीचे निसर्गसौंदर्य लाभले असूनही केवळ भौतिक साधने आणि वाहतुकीच्या साधनाच्या मर्यादेमुळे त्या प्रदेशातील पर्यटन स्थळाच्या विकासाला खीळ बसल्याचे दिसते. पर्यटक वाहतुकीच्या साधनांचा उपयोग करत असतो. त्या उपयोगितेवर

उपलब्ध वाहतुकीची साधने, पर्यटन स्थळांमधील अंतर, पर्यटकाची आर्थिक स्थिती, वाहतुकीतील सुलभता आणि सुगमता या सर्व गोष्टींचा परिणाम होत असतो.

नजीकच्या पर्यटन स्थळावर जाण्याकरिता रस्ते वाहतुकीला प्राधान्य दिले जाते.

मध्यम अंतरावरील पर्यटन स्थळांना भेटी देण्याकरिता सरकारी व निमसरकारी वाहतुकीच्या

साधनाबरोबर रस्ते आणि रेल्वे वाहतुकीला प्राधान्य दिले जाते तर दूरच्या अंतरावरील पर्यटन स्थळांना भेटी देण्याकरिता रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतूक हा पर्याय निवडला जातो. याशिवाय परदेशी पर्यटनाकरिता आर्थिक सुबत्ता कमी असलेल्या पर्यटकांकडून जलवाहतुकीचा पर्यायही निवडला जातो. प्रदेशातील भौगोलिक रचना व हवामान याचाही परिणाम वाहतुकीवर होताना दिसतो. पर्यटनामध्ये वाहतूक हा केंद्रीभूत घटक आहे.

वाहतूक व पर्यटन यांचा सहसंबंध अत्यंत जवळचा असल्याचा दिसतो.

2. पर्यटन आणि पर्यावरण: आपल्या सभोवतालच्या मूर्त आणि अमूर्त घटकांनी मिळून बनलेल्या परिस्थितीस ‘पर्यावरण’ असे म्हणतात. सभोवतालच्या पर्यावरणीय परिस्थितीमध्ये सजीव आणि निर्जीव घटकांचा घनिष्ठ सहसंबंध असतो. या सहसंबंधामुळेच. पर्यावरणाचा विकास होत असतो. सभोवतालच्या पर्यावरणातील नैसर्गिक देखावे, वनस्पती, प्राणी, भूपृष्ठ रचना, त्यामधील डोंगररांगा, दऱ्या, धबधबे, जलाशये त्याचप्रमाणे विविध हवामानाचे प्रदेश हे मानवी दृष्टीने आकर्षण बिंदू असतात. पर्यटन घडून येत असताना मानव या विविध सृष्टिसौंदर्याने नटलेल्या ठिकाणांना भेटी देत असतो आणि आपल्या पद्धतीने त्याचा आस्वादही घेत असतो. एकूण पर्यटकांपैकी ऐंशी टक्क्यांहून अधिक पर्यटक निसर्गसंपन्न पर्यटन स्थळांना भेटी देत असतात. पर्यटक जेव्हा पर्यटन स्थळांना भेटी देतात त्या वेळी तेथील पर्यावरणाची हानी होताना दिसते. त्यामुळे पर्यटन स्थळांवर भूप्रदूषण जलप्रदूषण, हवाप्रदूषण यांसारख्या समस्या निर्माण होतात. एखाद्या पर्यटन स्थळावर अधिक गर्दी

वाढल्यामुळे ज्या पर्यावरणीय समस्या निर्माण होतात त्याच्या दीर्घकालीन विपरीत परिणाम पर्यटन स्थळावरील जैवविविधतेवर होतो.

नैसर्गिक साधनसंपत्ती हा पर्यटनाचा आत्मा आहे. एखाद्या पर्यटन स्थळावरील सृष्टिसौंदर्य नाहीसे झाल्यास किंवा त्यामध्ये बदल ऋणात्मक झाल्यास पर्यटकांचा त्या पर्यटन स्थळाकडील ओघ कमी होतो. त्यामुळे या प्रकारच्या पर्यटन स्थळावर आणि पर्यटनावर परिणाम होऊ नये याकरिता त्या पर्यटन स्थळावरील पर्यावरणाची हानी होणार नाही याकरिता प्रयत्न केले जाणे गरजेचे आहे. पर्यटनातून पर्यावरणाचा चिरस्थायी विकास (Sustainable Development) घडून आणण्याकरिता प्रयत्न करणे गरजेचे आहे. याकरिता पर्यटकांमध्ये पर्यावरणाच्या संदर्भात जाणीव-जागृती करून निसर्गाचा, सभोवतालच्या परिसराचा ह्रास होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. एकाच पर्यटन स्थळावर होणारी गर्दी कमी करण्यासाठी पर्यायी पर्यटन स्थळांचा विकास करणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळावर पर्यावरणीय कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणेपर्यटन स्थळांच्या क्षमतेपेक्षा अधिक पर्यटकांना येण्यासंदर्भात अटकाव करणे, मृदा संधारण, जल संधारण, जैवविविधतेचे रक्षण करणे या संदर्भातील नियमांचे व कायद्याचे काटेकोर पालन पर्यटन स्थळांवर होणे गरजेचे आहे.

वनस्पती आणि प्राणी यांची विपुलता असलेल्या प्रदेशामध्ये पर्यटन करत असताना कोणकोणती काळजी घ्यावी या संदर्भात समाजामध्ये प्रबोधन होणेही गरजेचे आहे. याप्रमाणे पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची इजा न पोहोचता त्या पर्यटन स्थळांचा पर्यायाने त्या प्रदेशाचा नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकास घडून येईल.

पर्यटन आणि नैसर्गिक सृष्टिसौंदर्य यांचे अतूट नाते आहे. निसर्गामध्ये होणारे पर्यटन है।

टाळता येऊ शकत नाही. मात्र पर्यावरणीय प्रदूषणे ही नक्कीच टाळता येऊ शकतात.

त्यामुळे निसर्गाची कोणत्याही प्रकारे हानी होऊ न देता पर्यावरणपूरक पर्यटन पडून

येण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

3. पर्यटन आणि संस्कृती : मानवाचा आहारविहार, आचारविचार, चालीरीती, रूढी व परंपरा या घटकांचा समावेश मानवी संस्कृतीमध्ये होतो. सांस्कृतिक देवाण – घेवाणीमुळे राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्यास मदत होते.

प्राचीन काळातील मिश्र, सुमेरियन, माया, सिंधू या संस्कृत्या प्रगत होत्या. या प्राचीन संस्कृत्यांमधील शहरांचे अवशेष पाहण्याकरिता शेकडो पर्यटक भेटी देत असतात. सांस्कृतिक भूदृश्य पाहण्याकरिता एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात प्रवास करत असतात. त्याचप्रमाणे अलीकडील काळात प्रवासाच्या विविध माध्यमांमुळे अनेक लोक सतत प्रवास करत असतात. प्रवास म्हणजेच पर्यटन करणाऱ्या लोकांना विविध सांस्कृतिक घटक पाहावयास मिळतात. सांस्कृतिक घटकांमधील परंपरा, साहित्य, भाषा, नृत्य, संगीत, आचार-विचार, आहार, राहणीमान, घरांची रचना, शेती करण्याची पद्धती यांसारख्या असंख्य बाबी पर्यटन म्हणजेच प्रवासात अनुभवायास मिळतात. प्रादेशिक बदलानुसार भाषा, आहार, पोशाख, नृत्य, संगीत, गायन, चित्रकला, शिल्पकला, हस्तकला यांमध्ये बदल होत असतो. त्याचा आस्वाद घेणे ही पर्यटकांच्या दृष्टीने एक पर्वणीच असते.

भारतामध्ये सांस्कृतिक विविधता मोठ्या प्रमाणात आहे. भारतामध्ये प्रत्येक राज्याची संस्कृती भिन्न आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारतामध्ये भाषा, कला, संगीत, सण, उत्सव, समारंभ या बाबतीत कमालीची प्रादेशिक विविधता आहे. भारतातील लाखो पर्यटक सण आणि उत्सवाच्या निमित्ताने विविध प्रदेशांना भेटी देत असतात. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील पंढरपूर, आळंदी, देहू या ठिकाणी होणाऱ्या जत्रा आणि वारीची परंपरा गणेशोत्सव काळात पुणे, मुंबई, कोकणात होणारी पर्यटकांची गर्दी त्याचप्रमाणे जन्माष्टमीचा मुंबई, पुणे आणि कोकणातील गोपाळकाला व दहिहंडी; श्रावण व भाद्रपद महिन्यातील अमावस्येला शेतकरी कुटुंबामध्ये साजरा करण्यात येणारा बैलपोळा, नारळी पौर्णिमा आश्विन महिन्यातील नवरात्र उत्सव, दसऱ्याचे सीमोल्लंघनः होळी व व धुलिवंदन त्याचप्रमाणे जानेवारी ते एप्रिल महिन्यांमध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक गावा विशिष्ट तिथीला अनुसरून साजऱ्या होणाऱ्या कुलदैवताच्या यात्रा किंवा जा. या यात्रेच्या निमित्ताने नोकरी किंवा कामधंद्याच्या निमित्ताने गावातून बाहेर गेलेले सर्व लोक तसेच पाहुणे व नातेवाईक एकत्र जमतात. महाराष्ट्रातील काही गावांच्या यात्रा प्रसिद्ध आहेत. उदा., जेजुरीचा खंडोबा, वीर नाथ म्हस्कोबा. ओडिशातील जगन्नाथपुरी येथील उत्सव, नागपंचमीला होणारी बत्तीस शिराळा (सांगली) येथील यात्रा अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

संस्कृती ही काळानुरूप बदलत असते. हा बदल लोकांच्या एकमेकांशी होणाऱ्या संपर्कातून होताना दिसतो. पर्यटन किंवा प्रवासामुळे लोकांचा एकमेकांशी जो संपर्क येतो त्यामधून विचारांची देवाण-घेवाण होते. भारतातील प्रत्येक राज्याची संस्कृती जरी भिन्न असली तरी प्रवासामुळे व पर्यटनामुळे लोकांना एकमेकांच्या संस्कृतीची चांगलीच ओळख झाली आहे. त्यामुळे राहणीमान, पोशाख, आहार यामध्ये प्रत्येकाने सोईस्कर बदलही करून घेतले आहेत. उदाहरणार्थ, दक्षिण भारतातील नाष्ट्याचे पदार्थ महाराष्ट्रीयन लोकांना आपलेसे वाटतात. सण-समारंभाच्या बाबतीतही काही प्रमाणात मिश्रण झाल्याचे दिसते. उदाहरणार्थ, उत्तर भारतातील करवाचौथ तसेच गुजरातमधील नवरात्र लोक आवडीने साजरे करतात. पोशाखपद्धतीच्या बाबतीतही दोन

दशकांपूर्वी परिधान करण्यात येणारे पारंपरिक सर्व पोशाख हद्दपार होऊन वापरण्यास सुलभ असे पोशाख परिधान करण्यात येऊ लागले..

थोडक्यात, प्रवासामुळे लोकांनी आपणास हवा तो सांस्कृतिक बदल करून घेतला आहे. या प्रकारच्या बदलामुळे सांस्कृतिक लक्षणाच्या प्रती लोकांची असणारी भावना बोथट होऊन या लक्षणांविषयी असणारी प्रखरता कमी झाल्याचे दिसते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास मदत होताना दिसत आहे. पर्यटनामुळे राष्ट्रीय ऐक्य वाढण्यास मदत होताना दिसत आहे.

4. पर्यटन आणि धर्म धर्म हा शब्द संस्कृतमधील 'य्' या शब्दाचा अर्थ धारक तत्त्व असा होतो. विशिष्ट प्रकारची आचार आणि विचारसरणी धारण करणे म्हणजे धर्म होय, धर्माचे मानवी जीवनातील स्थान महत्त्वपूर्ण आहे. मानवी आचारविचार, जीवनप्रणाली, विवाह कायदा, न्याय, कुटुंबसंस्था, जातिसंस्था, कला या घटकांवर धर्माचा प्रभाव जाणवतो. मानवी समाजाच्या भावना व श्रद्धा धर्माशी निगडित असतात. जगामध्ये धर्माचे विविध प्रकार आढळतात. त्यामध्ये एकेश्वरीय धर्म (इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध); अनेकश्वरीय धर्म (हिंदू व जैन); याशिवाय सार्वभौमिक धर्म व वांशिक धर्म असेही प्रकार होतात. सार्वभौमिक धर्म संपूर्ण जगामध्ये आढळतात. जगातील कोणत्याही नागरिकास या धर्मात मुक्त प्रवेश आहे. यामध्ये ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम हे प्रमुख धर्म आहेत. हिंदू, जैन, यहुदी, बहाई हे वांशिक धर्म आहेत. या धर्माचा अंगीकार करण्यासाठी विशिष्ट जीवनशैली व सांस्कृतिक प्रतिमांचा अंगीकार करावा लागतो. धर्माच्या बाबतीत असणाऱ्या मूर्त लक्षणांमध्ये धार्मिक स्थळे, देव-देवतांच्या प्रतिमा, धर्म, ग्रंथ, धार्मिक भावना जपणाऱ्या पवित्र स्थळे यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. धार्मिक स्थळांना प्रचंड महत्त्व असते. यामुळे धार्मिक स्थळांबरोबर ठिकाणांनाही महत्त्व येते. विशिष्ट धर्माची विशिष्ट अशी पवित्र धार्मिक स्थळे आहेत : (i) ख्रिश्चन धर्म व्हॅटिकन सिटी गोवा येथील चर्च. इस्लाम धर्म मक्का, भविना, सौवी अरेबिया, जामा मशीद, हाजी अली येथील मकबरे व मस्जिदी, बौद्ध धर्म इंडोनेशिया, कम्बोडिया, चीन, भारत. शीख धर्म अमृतसर (पंजाब), पोटांसाहेब (उत्तराखंड), नांदेड (महाराष्ट्र). (v) जैन धर्म तीर्थंकराची मंदिरे (गुजरात व राजस्थान); बिहारमधील वैशाली याशिवाय दक्षिण भारत. बहाई धर्म इस्रायल येथील हैपा हिंदू धर्म चारधाम, बारा ज्योतिर्लिंग, शक्तिपीठे, काशी, प्रयाग, तिरुपती बालाजी, जगन्नाथपुरी, शिर्डीचे साईबाबा, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शेगावचे गजानन महाराज, देहू, आळंदी, पंढरपूर या धार्मिक स्थळांवर देवाची पूजा, प्रार्थना, होमहवन, सावन, दानधर्म, उपवास, व्रत-वैकल्ये, याचा जत्रा साजरे केले जातात. त्यामुळे या धार्मिक पर्यटन स्थळांना दरवर्षी लाखो पर्यटक भेटी देत असतात. या पर्यटकांचे धार्मिक पर्यटन हे बहुतांशी कौटुंबिक व सामूहिक स्वरूपाचे असते.

या पर्यटनाच्या दरम्यान लोक धार्मिक पर्यटन स्थळांबरोबर ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व नैसर्गिक पर्यटन स्थळांचाही आस्वाद घेत असतात. भारतासारख्या देशात रूढी-परंपरा व सण-उत्सव यांचे पालन करण्याकरिता मोठ्या प्रमाणात धार्मिक पर्यटन घडून येत असल्याचे दिसते.

5. पर्यटन आणि निवासस्थाने निवासस्थानांना पर्यटनामध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कोणत्याही पर्यटन स्थळाचा विकास हा त्या ठिकाणी असणाऱ्या सेवा-सुविधांच्या आधारे होत असतो. या सेवा-सुविधांमध्ये निवासस्थानाचादेखील समावेश झालेला आपणास दिसून येतो. निवासस्थानाचे अनेक प्रकार आपल्याला पाहावयास मिळतात. निवाराव्यवस्थेमध्ये आघाडीवर असणारा उद्योग म्हणजेच हॉटेल व्यवसाय होय, ज्याची सुरुवात सन 1313 मध्ये पॅरिस या ठिकाणी झाली. काळानुरूप हॉटेल व्यवसायामध्ये बदल होत गेले आणि त्यांचे अनेक प्रकार आज पाहावयास मिळतात. अगदी एक स्टार हॉटेलपासून ते सेव्हन स्टार हॉटलपर्यंत त्याचे वर्गीकरण केले जाते, हे वर्गीकरण त्या हॉटेलमध्ये मिळणाऱ्या सेवा-सुविधा, खाद्यपदार्थांची संख्या आणि खाद्यपदार्थ उपलब्धतेचा कालावधी यावरून केले जाते. निवासस्थानाचे वर्गीकरण पाहिल्यास आपल्याला त्याचे अनेक प्रकार पाहावयास मिळतात.

व्यापारी हटिल

आंतरराष्ट्रीय हॉटेल

कॅप्सूल हॉटेल

रिसॉर्ट

निवासी हॉटेल

तरंगते / तरंगणारे हॉटेल

मोटेल

प्रवासी अतिथी सेवा

युथ हॉस्टेल

अतिथीगृह

धर्मशाळा

हॉलिडे व्हिलेज

सरकारी विश्रामगृहे

तंबू व राहुट्या

निवासस्थानामध्ये पुरविल्या जाणाऱ्या सेवासुविधा, त्यासाठी आवश्यक असणारा कर्मचारीवर्ग आणि एकूणच अर्थव्यवस्थेतील त्याचे महत्त्व हे पर्यटनाच्या व्याप्तीचा एक भाग आहे. बदलत्या पर्यटकांच्या आवडीनिवडी, अभिरुची या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पर्यटनात निवासस्थानावर किंवा निवासस्थानाच्या निवडीवर परिणाम करताना दिसून येतात.

6. पर्यटन आणि राष्ट्रीय एकात्मता : पर्यटन भूगोलाच्या व्याप्तीचा हा एक मूलभूत भाग आहे. पर्यटनामुळे देशातील राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते, पर्यटक ज्या वेळी आपल्याच देशातील अनेक राज्यांमध्ये पर्यटनासाठी जात असतो त्या वेळी त्या प्रदेशातील भाषा, आचारविचार जरी भिन्न असले तरी त्या प्रदेशाचे त्याचे नाते जुळते आणि यातूनच राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. भारतामध्ये जम्मू-काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत तर गुजरातपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत होणाऱ्या पर्यटनामुळे भारतीय पर्यटकांच्या मनामध्ये संपूर्ण भारताविषयी राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागलेली आहे. पर्यटनामध्ये देशाची गौरवशाली ऐतिहासिक ठिकाणे किंवा धार्मिक ठिकाणे पाहण्याकडे पर्यटकांचा कल अधिक प्रमाणात दिसतो. यातूनच राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते.

7. पर्यटन आणि भाषा भाषेमुळे मानवी समूहाचे अनेक गटांमध्ये वर्गीकरण झालेले आहे. उदाहरणार्थ, भारत देशामध्ये भाषावार प्रांतरचना झाल्यामुळे अनेक राज्ये निर्माण झाली. पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाण होते. त्यात भाषेचा फार मोठा वाटा असतो. पर्यटकांमुळे स्थानिक भाषेमध्ये अनेक पारिभाषिक शब्द नव्याने येतात. उदा., ट्रेकिंग, हायकिंग, रॅपलिंग इत्यादी शब्द विदेशी पर्यटकांकडून भारतीय भाषांमध्ये आलेले आपणास दिसून येतात किंवा विदेशी पर्यटकांकडून आपण ते आत्मसात केलेले आहेत. भाषेच्या साहाय्याने पर्यटनानिमित्त सामाजिक व सांस्कृतिक बदलाचे विश्लेषण केले जाते. पर्यटनामुळे पर्यटकांना अनेक भाषा ऐकायला मिळतात. त्यातील अनेक शब्द कालांतराने परवलीचे होऊन जातात. पर्यटनविषयक समस्या आणि त्यांचा अभ्यास पर्यटनाच्या विकासाबरोबर त्या प्रदेशांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांचादेखील अभ्यास हा पर्यटन भूगोलामध्ये केला जातो. पर्यटनातून त्या प्रवेशाची पर्यावरणाची हानी, त्या प्रदेशावर ती निर्माण होणारा आर्थिक ताण, सामाजिक प्रश्न, संस्कृतीचा -हास यांसारख्या समस्या निर्माण होतात. अशा समस्या अतिशय कल्पकतेने सोडवाव्या लागतात आणि त्या पुन्हा निर्माण होणार नाहीत याचीही काळजी घ्यावी लागते किंवा तशा उपाययोजना कराव्या लागतात. पर्यटन स्थळांवर पर्यटकांबरोबरच अनेक समस्या आलेल्या असतात. या समस्या स्थानिक प्रदेशातील लोकांनासुद्धा त्रासदायक ठरत असतात. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असणारी कचऱ्याची समस्या, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची समस्या, मलनिस्सारणाची समस्या किंवा छोट्या-मोठ्या चोरीची समस्या अशा अनेक समस्या निर्माण झालेल्या असतात की, त्यांचा अभ्यासदेखील पर्यटन भूगोलामध्ये होऊ लागलेला आहे.

8. पर्यटकांची वाढती संख्या पर्यटन व्यवसाय हा अलीकडच्या कालखंडामध्ये अधिक वेगाने वृद्धिंगत होणारा व्यवसाय आहे. मानवाच्या वाढत्या गरजा आणि त्यातून वाटणारा ताण हलका करण्यासाठी पर्यटक प्रामुख्याने पर्यटनस्थळी भेट देण्यासाठी जात. असतात, उच्च राहणीमान, वाहतुकीच्या जलद सुविधा राहण्याची योग्य सुविधा त्याचबरोबर पर्यटन स्थळांचा झालेला विकास, पर्यटन केंद्राची माहिती, संदेशवहनाचा प्रसार यामुळे पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. या वाढत्या पर्यटकांच्या संख्येचादेखील अतिरिक्त ताण पर्यटन केंद्रावर आणि स्थानिक प्रदेशावर आलेला आपणास दिसून येतो. त्यामुळे पर्यटकांच्या बदलत्या दृष्टिकोनाला चालना देण्याच्या दृष्टीने पर्यटनावर होणाऱ्या बदलाचा अभ्यास होऊ लागला आहे. पर्यटकांना पर्यटनासाठी पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी नव्या पर्यटन स्थळांचा शोध घेणे आणि त्या पर्यटन स्थळांची जाहिरात करणे हा देखील पर्यटन भूगोलाचा महत्त्वाचा अभ्यासविषय बनत चाललेला आहे.

## पर्यटनात भूगोलाची भूमिका ROLE OF GEOGRAPHY IN TOURISM

बहुतांशी पर्यटक निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटनाला प्राधान्य देतात. किंबहुना, सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळांना भेटी देत असताना नैसर्गिक सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेतला जात असतो. सर्व प्रकारची पर्यटन स्थळे (उदा., ऐतिहासिक गड किल्ले, स्मारके, धार्मिक पवित्र स्थळे, सामाजिक व सांस्कृतिक स्थळे) आणि भौगोलिक घटकांचा म्हणजेच नैसर्गिक घटकांचा घनिष्ठ संबंध असतो. सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळांना नैसर्गिक पार्श्वभूमी लाभलेली असते. एखाद्या पर्यटन स्थळावरील स्थान महात्म्याशिवाय त्या पर्यटन स्थळावरील स्थल- वैशिष्ट्ये, निसर्गसौंदर्य, परिसर, गुणवत्ता, भूपृष्ठीय उठाव आणि आल्हाददायी हवामान तसेच वेगवेगळा प्रजातीच्या वनस्पती व प्राणी यामुळे पर्यटन स्थळांना विशिष्ट महत्त्व प्राप्त होते. पर्यटन स्थळांवरील विविध निसर्गरम्य देखावे, जाण्या-येण्याचे विविध मार्ग, पायवाटा, पाणवठे, झरे, डोंगर, वन्या, कडेकवान्या आणि निसर्गसंपन्न निवासस्थाने हे सर्व घटक पर्यटकांना आकर्षित करत असतात, त्यामुळे विविध कारणांसाठी पर्यटन केले जात असले तरी सर्व प्रकारच्या पर्यटनामध्ये नैसर्गिक सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेतला जातो. नैसर्गिक पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्याही अधिक असते.आधुनिक काळात एकूण व्यावसायिक संरचना बदलली गेल्याने शारीरिक कष्टाबरोबर बौद्धिक कामेही जास्त प्रमाणात वाढलेली आहेत. या प्रकारच्या कामामुळे बऱ्याचदा ताणतणावाचे प्रसंग निर्माण होतात. मानवी मनावर येणारा ताण कमी करण्याच्या दृष्टीने पर्यटन हा एक चांगला उपाय आहे. लोकांचा मनोरंजन आणि करमणुकीकडे कल वाढू लागला आहे. बऱ्याचदा वैद्य हे रुग्णाला सल्ला देतात की, हवापालट करून या; म्हणजेच वेगळ्या वातावरणात निसर्गाच्या सान्निध्यात भरपूर वनराई असलेल्या प्रदेशात प्रवास/पर्यटन केल्यास शुद्ध व मोकळी प्रदूषणरहित हवा मिळून शरीरामध्ये उत्साह संचारला जातो. यातून अनेक थंड हवेच्या ठिकाणावर आणि निसर्गसंपन्न अशा स्थळांवर आरोग्य, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य उंचावण्याकरिता पर्यटन करण्याकडे पर्यटकांचा अधिक कल असल्याचे दिसून येते.

पर्यटनामध्ये भूगोलाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अगदी पर्यटनाला जाण्याच्या आधी पर्यटनाचे नियोजन करत असताना पर्यटक नकाशाच्या आधारे रस्तेवाहतुकीचे विविध मार्ग, प्रादेशिक अंतरे, त्या प्रदेशातील हवामान आणि इतर घटकांची माहिती ही भौगोलिक घटकांच्या अभ्यासातूनच मिळवित असतो. ही माहिती मिळवित असताना पर्यटकाला भौगोलिक ज्ञानाचा उपयोग होत असतो. याशिवाय नैसर्गिकदृष्ट्या संपन्नता असणारी विविध पर्यटन आकर्षणे यांची संख्याही अधिक असते. त्यामुळे भूगोलाच्या अभ्यासाशिवाय पर्यटन हे केवळ अशक्यप्राय असते. म्हणूनच भूगोल आणि पर्यटन या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे स्पष्ट होते.

पर्यटनामध्ये इतर शाखांचाही समावेश होतो, ते पुढीलप्रमाणे भूरूपशास्त्र आणि पर्यटन : भूरूपशास्त्रामध्ये पृथ्वीच्या पृष्ठभागावरील विविध

भूमिस्वरूपांच्या निर्मितीचा अभ्यास केला जातो. प्राथमिक, द्वितीय आणि तृतीयक श्रेणीची भूरूपे पृथ्वीच्या पृष्ठभागावर तयार होत असतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर या तयार झालेल्या भूरूपांच्या वैविध्यांमध्ये पर्यटन बहरलेले आपणाला दिसते. खनन, वहन आणि संचयन या कार्यांमुळे निर्माण झालेली असंख्य भूरूपे पर्यटकांची आकर्षणे असतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील पर्वत, नद्या, दऱ्या, समुद्रकिनारे ही पर्यटकांची आकर्षणे असतात.

त्यातूनच भूरूपे व पर्यटन यांचा संबंध प्रस्थापित होतो. भूरूपांचे निरीक्षण करण्याच्या उत्सुकतेमुळे पर्यटन वाढीस लागते.

उदाहरणार्थ, पुणे जिल्ह्यातील कुकडी नदीने अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज या ठिकाणी तयार केलेले तसेच पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर (खेड) तालुक्यातील चासकमान येथील जगप्रसिद्ध रांजणखळगे; जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यांमध्ये हिमालयाच्या पर्वताच्या कुशीत हिमनद्यांनी तयार केलेल्या 'यू' आकाराच्या कन्या हे पर्यटकांचे आकर्षण असतात. किनारपट्टीच्या प्रवेशांमध्ये सागरी लाटांच्या क्षरण कार्यामुळे तयार होणारी असंख्य भूरूपे व संचयन कार्यामुळे तयार होणारे समुद्रकिनारे (बीचेस) हे पर्यटकांना आकर्षित करत असतात. नदीच्या पात्रामध्ये नवीच्या वाहत्या पाण्याने तयार केलेले धबधबे प्रसिद्ध आहेत. चुनखडीच्या प्रवेशांमध्ये भूमिगत पाण्याने तयार केलेले लवणस्तंभ पर्यटकांची आकर्षण आहेत. उदाहरणार्थ, विशाखापट्टणमजवळील आर्को कली ही भूमिगत पाण्याने तयार केलेल्या भूरूपांचे उत्तम उदाहरण आहे. वाळवंटी प्रदेशामध्येसुद्धा वाऱ्याच्या क्षरण, वहन आणि संचयन कार्यामुळे तयार होणाऱ्या भूरूपांची माहिती घेण्यासाठी असंख्य पर्यटक राजस्थानातील पर्यटन स्थळांना भेटी देत असतात.

अलीकडील काळात विकसित झालेला भू-पर्यटन हा प्रकार भूगोल आणि पर्यटन यांच्या सहसंबंधाची जाणीव आपणास अधिकच करून देतो. हवामानशास्त्र आणि पर्यटन हवामानशास्त्रामध्ये पृथ्वीच्या पृष्ठभागावरील

वेगवेगळ्या ठिकाणावरील हवामानाचा अभ्यास केला जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर तापमान, पर्जन्यमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग यामध्ये सारखेपणा नाही. यामुळे भूपृष्ठावर वेगवेगळ्या हवामानाचे प्रदेश तयार झालेले आहेत. सर्वसाधारणपणे थंड आणि आल्हाददायी हवामानाच्या प्रदेशामध्ये पर्यटन अधिक वेगाने विकसित होते. उदा., युरोपीय देश तर भारतातील जम्मू-काश्मीर.

भारतीय हवामानाचा विचार करता भारतामध्ये तिन्ही ऋतूंमध्ये पर्यटन घडून येते. पावसाळ्याच्या दिवसात वर्षाविहारासाठी पर्यटक बाहेर पडतात तर उन्हाळ्यामध्ये थंड हवेच्या ठिकाणी पर्यटन घडून येते. हिवाळा हा ऋतू तर पर्यटनासाठी बहरलेला ऋतू असतो. पर्यटनासाठी आरोग्यदायी हवामान व शांत वातावरण अशी ठिकाणे योग्य असतात.

युरोपीय देशांमधील उन्हाळी पर्यटन अधिक आरोग्यदायी व अनुकूल समजले जाते. तुलनेने येथील हिवाळे हे अतिशय कडक थंडीचे असतात.

सागरशास्त्र आणि पर्यटन पर्यटन आणि सागर यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या 71 टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे आणि यामुळेच सागराच्या सान्निध्यामध्ये सागरी हवा, पाण्याचे प्रवाह, सागरी लाटा, सागरसंपत्ती है। मानवी व्यवसायाशी निगडित असलेल्या बाबी आहेत. सागराच्या सान्निध्यामध्ये किनारपट्टीच्या प्रदेशात पर्यटन अधिक प्रमाणात विकसित होते. सागर किनारपट्टीच्या प्रवेशात सौरस्नानासाठी (सूर्यप्रकाश घेण्यासाठी), समुद्रस्नानासाठी व सागराचे सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक जातात. पूर्वीपासूनच पर्यटक सागर सफरीचा आनंद घेत आहेत. आजमितीस मोठमोठ्या क्रूझच्या साहाय्याने महिने नृ-महिने पर्यटन केले जाते. अनेक जलमार्गांच्या विकासाबरोबरच सागरी पर्यटनाचा विकास झालेला आहे. उदा.

मुंबई से गोवा ने प्रवास करण्यासाठी असंख्य पर्यटक आतुरलेले आहेत. 4. जैविक भूगोल आणि पर्यटन जैविक भूगोलामध्ये (Biogeography) पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वनस्पती आणि परिसंस्था यांचा अभ्यास केला जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर असणाऱ्या वेगवेगळ्या जंगल प्रवेशांमध्ये पर्यटन व्यवसाय वाढीस लागलेला आहे. गवताळ प्रदेशामध्ये आणि घनदाट अरण्याच्या प्रवेशांमध्ये साहसी पर्यटक हे पर्यटन करताना आपल्याला दिसून येतात राखीव व सुरक्षित जंगले आणि अभयारण्ये ही अलीकडच्या कालखंडामध्ये पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. भारतामध्ये अभयारण्यांच्या क्षेत्रांमध्ये पर्यटन वाढीस लागले आहे. उदा., महाराष्ट्रातील ताडोबा अभयारण्य हे वाघांसाठी प्रसिद्ध आहे.

फॉरेस्ट टुरिझम, ॲडव्हेंचर टुरिझम यांसारख्या संकल्पना पर्यटनामध्ये नव्याने आल्या असल्या तरी पूर्वीपासून पर्यटक जंगल भागामध्ये पर्यटनासाठी जात होते. जंगलाच्या सान्निध्यामध्ये जंगलाचा आणि प्राण्यांचा अभ्यास करण्यासाठी अनेक हौशी पर्यटक भेटी देत असतात. या पर्यटकांना भौगोलिक ज्ञान असेल तर अरण्यांच्या प्रदेशातील पर्यटन हे अधिकच आनंददायी होते.

ऐतिहासिक ठिकाणे आणि पर्यटन : अनेक ऐतिहासिक ठिकाणे भूरूपांशी संबंधित असतात, ऐतिहासिक गड, किल्ले हे डोंगराच्या उंचवट्यावर उभारलेले आहेत. अनेक धार्मिक ठिकाणे आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या प्राचीन स्थळांना समृद्ध भौगोलिक वारसा असतो. महाराष्ट्रामध्ये शिवकालीन गड हे पर्यटकांचे आकर्षण आहे. हे सर्व गड / किल्ले भौगोलिक वारशामुळे त्यांच्या ठिकाणी स्थापित झालेले दिसतात. हिंदू धर्माशी निगडित असणारी बारा ज्योतिर्लिंगे ही निसर्गसंपन्न भौगोलिक वारसा असलेल्या प्रवेशात आढळून येतात. ज्या ठिकाणांना ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे त्यातील जवळपास सर्वच ठिकाणांना संपन्न भौगोलिक वारसा लाभला आहे. त्यामुळे ऐतिहासिक व धार्मिक स्थळांवर पर्यटक पर्यटन करत असताना निसर्गाच्या देखाव्यांचाही आस्वाद घेत असतात.

सांस्कृतिक स्थळे आणि पर्यटन: जगाच्या पाठीवर अनेक सांस्कृतिक वारसा ठिकाणे ही पर्यटकांना आकर्षित करत असतात. सांस्कृतिक स्थळाच्या ठिकाणी त्या-त्या देशाची परंपरा आणि संस्कृती ही पर्यटकांच्या ज्ञानामध्ये भर घालत असते.

उदाहरणार्थ, प्राचीन भारतीय संस्कृतीची ठिकाणे किंवा धार्मिक ठिकाणे ही त्या धर्माचे व संस्कृतीची आदर्श स्थाने असतात आणि मग त्या ठिकाणी संस्कृती व धार्मिक पर्यटन घडून येते. भारतामध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक पर्यटन हे इतर पर्यटन प्रकारांच्या तुलनेमध्ये अधिकच झालेले आपल्याला दिसते. यातूनच मथुरा, वाराणसी, काशी, अयोध्या, बारा ज्योतिर्लिंगांची ठिकाणे ही पर्यटकांची आकर्षणे आहेत. या सर्व धार्मिक ठिकाणांना उत्तम भौगोलिक पार्श्वभूमी आढळून येते. त्यामुळे भूगोल आणि पर्यटन यांचा सहसंबंध अधिक जवळचा आहे. किंबहुना पर्यटन विकासामध्ये भूगोल विषयाचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. बऱ्याचदा भूगोल आणि पर्यटन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले जाते. अलीकडील काळात विकसित झालेली 'पर्यटन भूगोल ही भूगोलाची शाखा याचे अत्यंत बोलके उदाहरण आहे.